दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
आकर्षण
संपादक : विजय सांगळे

वर्ष ५ ▪ अंक ३०७ ▪ मंगळवार ८ सप्टेंबर २०२६ ▪ पाने ४ ▪ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

डीएसपी चौकातील वाहतूक कोंडीला आता कायमस्वरूपी तोडगा

उड्डाणपुलाचा मार्ग मोकळा; पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्याला यश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या डीएसपी चौकातील कोंडीचा प्रश्न आता कायमस्वरूपी मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. शहराच्या वाढत्या वाहतुकीचा आणि भविष्यातील गरजांचा विचार करून डीएसपी चौकात उड्डाणपूल उभारण्याच्या कामाला गती मिळाली असून, या प्रकल्पासाठी ६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने तसेच आमदार संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण प्रकल्प पुढे आला आहे.

कोपरगाव-शिर्डी-कोल्हार-अहिल्यानगर या प्रमुख मार्गावरील डीएसपी चौक हा शहरातील वाहतुकीचा महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. संभाजीनगरकडून येणारी वाहने तसेच शिर्डी, कोपरगाव, कोल्हार आणि शहराच्या विविध भागांकडे जाणारी वाहतूक या चौकातून मोठ्या प्रमाणावर होते. वाढत्या वाहनसंख्येमुळे विशेषतः सकाळी आणि सायंकाळच्या

गर्दीच्या वेळेत या ठिकाणी मोठी कोंडी होत होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने काही मिनिटांचा प्रवास पूर्ण करण्यासाठी नागरिकांना बराच वेळ वाहतुकीत अडकून राहावे लागत होते. परिणामी, वेळ आणि इंधनाचा अपव्यय होण्याबरोबरच रोजच्या प्रवासाचा ताणही वाढत होता. शहराच्या दैनंदिन वाहतुकीशी निगडित हा प्रश्न लक्षात घेऊन डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी डीएसपी चौकातील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाय करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. शहराचा विस्तार, वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या लक्षात घेता भविष्यातील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधा उभारण्याची गरज त्यांनी मांडली. त्यांच्या पाठपुराव्याला पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

डीएसपी चौकातील प्रस्तावित उड्डाणपुलासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या या प्रकल्पाला आता प्रत्यक्ष अंमलबजावणीची दिशा मिळाली आहे.

उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर डीएसपी चौकातील मुख्य वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे. शिर्डी, कोपरगाव, कोल्हार तसेच अहिल्यानगर शहराच्या विविध भागांकडे जाणाऱ्या वाहनांना अधिक सुरळीत मार्ग उपलब्ध होईल. परिणामी, चौकातील कोंडी कमी होऊन प्रवासाचा वेळ वाचण्यास मदत होणार आहे. डीएसपी चौकातील वाहतूक कोंडीचा परिणाम केवळ वाहनांच्या रांगांपुरता मर्यादित नव्हता. या कोंडीत अडकणाऱ्या नागरिकांचा वेळ, इंधन आणि श्रम खर्ची पडत होते. कामावर जाणारे कर्मचारी, विद्यार्थी, व्यापारी, रुग्णवाहिका तसेच शहराबाहेर प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा ▪ पान ४ वर

एलसीबीच्या छाप्यात राहुरीत आठ जुगारी रंगेहाथ ताब्यात

साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त, गगापूर शिवारात कारवाई

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने राहुरी तालुक्यातील गंगापूर शिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून आठ जुगाऱ्यांना रंगेहाथ ताब्यात घेतले. या कारवाईत ३ लाख ४४ हजार ७१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुनील पवार, गणेश धोत्रे, अजिनाथ पाखरे, रमीजराजा आतार व विशाल तनपुरे यांचे पथक अवैध व्यावसायिकांचा शोध घेत होते. दिनांक ७ सप्टेंबर रोजी पथक राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना, गंगापूर शिवारातील एस. के. पेपर मिलसमोरील एका पत्र्याच्या शेडमध्ये रामदास नान्नोर हा व्यक्ती पत्त्यावर पैशांची बाजी लावून जुगार खेळवत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीची खात्री करून पथकाने शेडवर छापा टाकला असता गोलाकार बसून जुगार खेळताना ज्ञानेश्वर पुंजा पवार (रा. कोल्हार खुर्द), अनिल दत्तात्रय होडगर (रा. पिंपळगाव फुणगी), चिमा खंडू वडीतके (रा. गंगापूर), बाळासाहेब विठ्ठल तुपे (रा. गळनिंब), मनोहर रामदास नान्नोर (रा. गंगापूर), किरण साहेबराव होण (रा. कडित), विठ्ठल बाळासाहेब चितळकर (रा. मांडवे) आणि रामदास रावजी नान्नोर (रा. गंगापूर) हे रंगेहात पकडले गेले. आरोपींची अंगझडतीत ४ हजार ७१० रुपयांची रोख रक्कम, ९० हजार रुपये किमतीचे ५ मोबाईल फोन आणि २ लाख ५० हजार रुपयांच्या ५ दुचाकी असा एकूण ३ लाख ४४ हजार ७१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिवरे कोरड्यात घरफोडी; साडेचार लाखांचा ऐवज लंपास

सोन्याचे दागिने व रोकड चोरीला; पारनेर पोलिसांत गुन्हा दाखल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पारनेर– तालुक्यातील हिवरे कोरडा येथे मध्यरात्रीच्या सुमारास घरफोडी करून चोरट्यांनी सुमारे ४ लाख ६० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पारनेर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१(४) व ३०५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडील नोंदीनुसार, हिवरे कोरडा येथील ६० वर्षीय शेतकऱ्याच्या घरात ६ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजल्यापासून ७ सप्टेंबर रोजी पहाटे साडेतीन वाजेपर्यंत चोरट्यांनी प्रवेश केला. घराचे कडी-कोयंडा तोडून घरात प्रवेश करून कपाटातील सोन्याचे दागिने व रोकड चोरून नेण्यात आली.

चोरीस गेलेल्या ऐवजात सुमारे तीन तोळे सोन्याचे दागिने, सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याची नथ, सोन्याचे कानातील दागिने तसेच १ लाख ५० हजार रुपयांची रोकड, असा एकूण ४ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल असल्याचे पोलिस नोंदीत नमूद आहे. घटनेची माहिती मिळताच पारनेर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. पोलिसांकडून चोरट्यांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू असून, परिसरातील हालचाली आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे तपासाला वेग देण्यात आला आहे.

शेवगावात दोन किलो गांजासह एकाला अटक, दोघे फरार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– स्थानिक गुन्हे शाखेने शेवगाव तालुक्यातील शहर टाकळी येथे छापा टाकून २ किलो १३० ग्रॅम गांजा, ८० चिलमी आणि वजन काट्यासह ७१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी संकेत सयाजी कोल्हे (वय २२, रा. शहर टाकळी) याला अटक करण्यात आली असून, त्याचे वडील सयाजी कोल्हे आणि गांजा पुरवणारा मोन्या पवार हे दोघे फरार आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक तथा अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे नोडल अधिकारी संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अनंत सालगुडे व पथक शेवगाव परिसरात गस्तीवर होते. त्यावेळी शहर टाकळी येथील सयाजी रंगनाथ कोल्हे हा घरात गांजा बाळगून विक्री करत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. यानंतर शेवगाव पोलीस स्टेशनचे पोलीस ▪ पान ४ वर

गणेशोत्सव काळात भारनियमन करू नये

विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयामाची मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– भगवान श्री वीर गोगादेव यांच्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित मिरवणुकी प्रसंगी सायंकाळी ७ ते १०.३० या कालावधीमध्ये वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या आहेत.व हिंदू समाजाच्या वतीने तीव्र संतप्त व्यक्त केला जात आहे.

या मिरवणुकीत मोठ्या संख्येने हिंदू समाज एकत्रित येत असतो. तसेच महिला व माता-भगिनींचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो.वीज पुरवठा खंडित झाल्याने ही मिरवणूक अंधाराच्या छायेखाली पार पडली.

हिंदू सण उत्सवाच्या काळात धार्मिक मिरवणुका प्रसंगी महावितरण विभागाने ()वीज पुरवठा खंडित करू नये,अशी मागणी वीज महा महामंडळाचे अति. कार्यकारी अभियंता सुभाष घाटोळ यांना निवेदनाद्वारे देण्यात आली.याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे अर्चक, पुरोहित,आयामाचे

विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,सहप्रमुख हरिभाऊ डोळसे,मनोहर भाकरे,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अमोल भांबरकर आदी उपस्थित होते.

तसेच येणारा गणेशोत्सव बारा दिवस असल्याने मोठ्या प्रमाणात धार्मिक पूजा-विधी व सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते.या कालावधीमध्ये श्री गणेशाच्या आगमनाच्या दिवशी शहरात मोठ्या प्रमाणात मिरवणुकीचे आयोजन करण्यात येते. तसेच गणेश भक्तांसाठी समाज प्रबोधनपर आराशीचे आयोजनही करण्यात येते.या कालावधीमध्ये वीज महामंडळाने भारनियमन व वीज पुरवठा खंडित करू नये, अशी मागणी विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर-पुरोहित आयामाच्या वतीने करण्यात आली आहे. हिंदू सण उत्सवाच्या काळात वीज पुरवठा खंडित केल्यास तमाम हिंदू समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल.असा इशारा यावेळी देण्यात आला.

कोणत्याही प्रकारचे कर्ज आता त्वरीत मिळवा!
गरजेला नक्कीच मदत आमची, उभे राहण्याची हिंमत तुमची !
राघव लोन सर्व्हिसेस
सर्व प्रकारच्या कर्ज सुविधा
▪ जलद मंजुरी ▪ कमी व्याजदर ▪ सुलभ हफ्ते
व्यावसायिक कर्ज 75 लाखांपर्यंत (विनातारण)
जुन्या जेसीबी,ट्रॅक्टर, हायवा,कार, इ. साठीही कर्ज पुरवठा

विनातारण कर्ज
▸ व्यवसायीक व पगारदारांसाठी खास सी.सी / ओ.डी सुविधा
▸ डॉक्टर लोन
▸ आकर्षक व्याजदर
तारण कर्ज
▸ घर,एन.ए प्लॉट,व्यवसायिक मालमत्ता यासाठी कर्ज सुविधा
▸ आर.झोन,गुंठेवारी,ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता यावरही त्वरीत कर्ज
वाहन कर्ज
▸ नविन व जुन्या कारसाठी कमीत कमी व्याजदरात त्वरीत कर्ज
▸ व्यावसायिक वाहनांसाठी शासकीय अनुदान
विनातारण व्यावसायिक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे : ▸ पॅन कार्ड ▸ आधार कार्ड ▸ शॉप ॲक्ट ▸ उद्यम आधार ▸ मागील तीन वर्षाचे आयटीआर ▸ बँक अकाऊंट स्टेटमेंट (पीडीएफ मध्ये) ▸ जीएसटी सर्टिफिकेट ▸ लाईट बिल ▸ फोटो
सर्व प्रकारच्या व्यवसायासाठी शासकीय कर्ज योजनांचे ऑनलाईन फॉर्म भरुन मिळतील तसेच कर्जासाठी योग्य मार्गदर्शन केले जाईल
अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ
मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम
ओ.बी.सी. महामंडळ योजना
(टीप - या योजनांसाठी सेवाशुल्क आकारले जाईल)
नियम व अटी लागू
700+ सिबिल स्कोअर 700+ असल्यास प्राधान्य
कोणतेही चालू कर्ज थकीत नसावे
आम्ही संपुर्ण महाराष्ट्रात कर्ज सेवा देतो
नामांकीत बँका व एनबीएफसी चे अर्थसहाय्य उपलब्ध !
अधिक माहितीसाठी संपर्क : 9960283285
पत्ता : शॉप नंबर 29,स्टेट बँके समोर,सुरजनगर,शिरुर,ता.शिरुर

दै. आकर्षण निवडक

पर्युषण पर्वानिमित्त सप्तक सदन येथे ब्याळूची व्यवस्था

अहिल्यानगर- जैन धर्मातील पवित्र पर्युषण महापर्वानिमित्त आनंद गुरू परिवाराच्या वतीने चौविहार (ब्याळू)ची व्यवस्था करण्यात आली आहे. दि. ८ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर २०२६ दरम्यान सायंकाळी ५ ते ६.३० यावेळेत खिस्त गल्ली येथील सप्तक सदन कार्यालयात ही व्यवस्था असेल. पर्युषण काळात बहुतांश जैन साधक तपस्या उपवास करतात. अनेक जण कामानिमित्त बाहेरगावहून नगर शहरात येतात. तसेच शहरात व्यवसाय करणारांनाही सूर्यास्ताच्या आधी घरी जाणे शक्य नसते. अशा सर्वांसाठी आनंद गुरू परिवारातर्फे दरवर्षी ही ब्याळूची व्यवस्था करण्यात येते. भाविकांनी या व्यवस्थेचा लाभ घ्यावा असे आवाहन आनंद गुरू परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

अरुण काका जगताप व ट्रस्टच्या वतीने साहित्य क्षेत्रात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

अहिल्यानगर- स्वर्गीय अरुण काका जगताप ट्रस्टच्या वतीने म.ना.पा च्या प्रमोद महाजन सभागृहात शिक्षक दिनाचे अवचित्य साधून साहित्य क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांचा सत्काराचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे अहिल्यानगर शाखेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल श्री ज्ञानदेव पांडुळे आणि कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल श्री राजेंद्र चोभे पाटील यांचा विशेष सन्मान चिन्ह व शाल श्रीफळ देऊन सत्कार जगताप परिवाराच्या वतीने करण्यात आला यावेळी आयुर्वेद शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री सचिन जगताप व शहराचे कर्तव्यदक्ष आमदार संग्राम भैय्या जगताप व्यासपीठावर उपस्थित होती यावेळी म.सा.पा.चे शहर कार्य-वाहक शिवाजी साबळे संयोजन समिती प्रमुख राजेंद्र उदागे निमंत्रक विठ्ठलराव लांडगे, शब्दगंध साहित्यिक परिषदेची संस्थापक सुनील गोसावी आदी मान्यवरांचा ही सन्मान करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सचिन जगताप ही होते यावेळी शहरातील प्रत्येक महानगरपालिकेच्या शाळेतील व खाजगी शाळेतील आदर्श शिक्षक व नवनिर्वाचित अभियंते पदाधिकारी यांच्या निवडी बाबतही सत्कार करण्यात आला या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना नगर शहराचे आमदार संग्राम जगताप म्हणाले आपल्या शहरातील साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी कर्तव्यात कसूर न ठेवता आणि समाज हितासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व सत्कार मूर्तीचे मी स्वागत करतो आपल्या नगरीच्या सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक उंची वाढवण्यासाठी ही सर्व मंडळी अहोरात्र सातत्याने समाज हिताच्या कार्यात पुढे येऊन सतत धडपड करत आहेत त्यांच्या निवडीबद्दल काका ट्रस्टच्या वतीने त्यांना मनःपूर्वक पुढील कार्यास शुभेच्छा व अभिनंदन आमदार संग्राम जगताप यांनी यावेळी दिले या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन समिती प्रमुख तथा शहर सहकारी बँकेचे चेअरमन प्राध्यापक माणिकराव विधाते सर यांनी केले तर याप्रसंगी शहरातील सामाजिक क्षेत्रातील नगरसेवक श्री सुरेश बनसोड व आदी मित्रपरिवार पदाधिकारी कार्यकर्ते या ठिकाणी मोठ्या संख्येने उपस्थित होते शेवटी सूत्रसंचालन पत्रकार विठ्ठल लांडगे यांनी केले.

शेतरस्त्यांच्या प्रश्नावर अहिल्यानगरचा 'ॲक्शन प्लॅन'!

अहिल्यानगर - शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या शेत, शिव व पाणंद रस्त्यांच्या प्रश्नाला आता प्रशासनाने गती देण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेची प्रभावी अंमलबजावणी करताना शेतरस्त्यांवरील अतिक्रमणे हटविणे, रस्त्यांची मोजणी व सीमांकन करणे तसेच प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्याचे कडक निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. अहिल्यानगर तहसील प्रशासनाच्या या निर्णयामुळे जिल्ह्यातील शेतरस्त्यांच्या प्रश्नांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता असून, हा उपक्रम राज्यासाठी दिशादर्शक ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी शेतरस्त्यांवरील अतिक्रमणे तातडीने हटवावीत, रस्त्यांची मोजणी व सीमांकन करावे, प्रलंबित प्रकरणे जलदगतीने निकाली काढावीत तसेच शासनाच्या शेत/पाणंद रस्ते योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करणारे निवेदन प्रशासनाकडे दिले होते. या निवेदनाची दखल घेत तहसील कार्यालयात महसूल, भूमी अभिलेख, पोलीस, वन विभाग आणि पंचायत समितीच्या संबंधित अधिकाऱ्यांची समन्वय बैठक घेण्यात आली. या बैठकीत शेत व शिव पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविणे, रस्त्यांची मोजणी-सीमांकन करणे, प्रलंबित तक्रारींचे निराकरण करणे आणि शेतकऱ्यांना प्रत्यक्ष रस्त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी विभागांनी समन्वयाने कार्यवाही करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

तलाठी कार्यालयात माहिती फलक शेतकऱ्यांना शेतरस्त्यांसंदर्भात अर्ज किंवा तक्रारी दाखल करताना अडचणी येऊ नयेत, यासाठी प्रत्येक महसूल व तलाठी कार्यालयात माहिती फलक लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

के. जी.महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे विश्वस्त संचालक माननीय श्री. किशोर मुनोत सर तसेच महाविद्यालयच्या परिसर संचालिका माननीय डॉ. स्वाती मुनोत उपस्थित होत्या. तसेच यावेळी शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात माननीय डॉ. स्वाती मुनोत यांनी यावेळी शिक्षक दिनाचे महत्त्व स्पष्ट करून विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांची भूमिका अत्यंत मोलाची असल्याचे सांगितले. महाविद्यालयाचे विश्वस्त संचालक माननीय श्री किशोर मुनोत सर यांनी शिक्षक दिनानिम्मित शिक्षकांना शुभेच्छा देत विध्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षकांचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रोहिणी क्षीरसागर यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. थोरात सर यांनी केले तसेच यावेळी डॉ. वर्षा कीर्तने, डॉ. प्रशांत खोपटीकार, प्रा. चाकोते, सौ. हर्षाली रासकर व विध्यार्थी उपस्थित होते.

चौथ्या श्रावण सोमवारी हरिहरेश्वर महादेव मंदिरात 'कैलास मानसरोवर'ची आकर्षक सजावट

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– प्रतिनिधी बागरोजा हडको, दिल्ली गेट येथील श्री हरिहरेश्वर महादेव मंदिरात हरिहरेश्वर मित्र मंडळ (ट्रस्ट)च्या वतीने नित्य सोमवार महाआरतीचा ५४ वा सोहळा तसेच चौथ्या श्रावण सोमवारनिमित्त 'कैलास मानसरोवर'ची आकर्षक व मनमोहक विशेष सजावट करण्यात आली. या विशेष सजावटीचे दर्शन घेण्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

श्रावण महिन्यातील सोमवार हा भगवान महादेवाच्या उपासनेसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे चौथ्या श्रावण सोमवारी हरिहरेश्वर महादेव मंदिरात सकाळपासूनच भाविकांची मोठी वर्दळ पाहायला मिळाली. 'कैलास मानसरोवर'च्या संकल्पनेवर आधारित करण्यात आलेली विशेष सजावट भाविकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. कैलास पर्वत आणि मानसरोवराचे धार्मिक महत्त्व भाविकांच्या मनात श्रद्धा निर्माण करणारे असल्याने या सजावटीला विशेष प्रतिसाद मिळाला.

नित्य सोमवार महाआरती भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. महाआरतीच्या वेळी 'हर हर महादेव', 'बम बम भोले'च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने भगवान हरिहरेश्वर महादेवाचे दर्शन घेत पूजा-अर्चना केली. विशेष सजावटीमुळे मंदिर परिसराला एक वेगळेच आध्यात्मिक स्वरूप प्राप्त झाले होते.

'कैलास मानसरोवर'च्या प्रतिकृतीसदृश करण्यात आलेली सजावट पाहण्यासाठी भाविकांची दिवसभर गर्दी होती. महादेवाचे निवासस्थान मानल्या जाणाऱ्या कैलास पर्वताची आणि पवित्र मानसरोवराची अनुभूती मंदिर परिसरात निर्माण करण्याचा मंडळाचा प्रयत्न भाविकांना विशेष भावला. सजावटीचे दर्शन घेताना अनेक भाविकांनी त्याचे कौतुक केले.

महाआरतीनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले. मोठ्या संख्येने आलेल्या भाविकांना महाप्रसादाचा लाभ मिळावा, यासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष नियोजन केले होते. संपूर्ण कार्यक्रमादरम्यान मंदिर परिसरात शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरण पाहायला मिळाले.

हरिहरेश्वर मित्र मंडळ (ट्रस्ट)च्या कार्यकर्त्यांनी चौथ्या श्रावण सोमवारनिमित्त 'कैलास मानसरोवर' ही संकल्पना साकारण्यासाठी विशेष मेहनत घेतली. सजावट, महाआरती तसेच भाविकांच्या सुविधांसाठी कार्यकर्त्यांनी घेतलेल्या परिश्रमामुळे हा धार्मिक सोहळा उत्साहात व यशस्वीपणे पार पडला. श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवार धार्मिक वातावरणात साजरा करण्याची परंपरा जपत मंडळाच्या वतीने करण्यात येत असलेल्या उपक्रमांचे भाविकांकडून कौतुक होत आहे.

विद्यार्थी सहाय्यक समितीतर्फे आयोजित गर्जतो मराठीच्या सुरेल मैफलीने अहिल्यानगरकर मंत्रमुग्ध

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– विद्यार्थी सहाय्यक समितीच्या वतीने सावेडी येथील रावसाहेब पटवर्धन स्मारकात आयोजित गर्जतो मराठी या नव्या-जुन्या मराठी गीतांच्या सांगीतिक कार्यक्रमाने अहिल्यानगरकरांची मने जिंकली. कधी ठेका, कधी टाळ्या.. अन् कार्यक्रमाच्या शेवटी मराठीसाठी सर्वच जण उभे राहिले. मराठी मनाला साद घालणाऱ्या सुरेल गीतांनी रसिकांची संपूर्ण सायंकाळ भारावून गेली.

समितीच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची अहिल्यानगरकरांना ओळख व्हावी, हा कार्यक्रमाचा उद्देश होता. नाशिक येथील सरगम थिएटर्स प्रस्तुत या कार्यक्रमात संगीतकार नंदकुमार देशपांडे व संतोष कराळे यांच्या कुशल वाद्यवृंदाने आणि निवेदक संजय किल्लेदार यांच्या खुमासदार निवेदनाने रसिकांना तब्बल तीन तास खिळवून ठेवले. गायकांच्या मधुर स्वरांनी मैफल अधिकच रंगतदार झाली. श्री गणेश गीताने सुरुवात झाल्यानंतर एक धागा सुखाचा, शंभर धागे दुःखाचे, शुक्र तारा मंद वारा, चंद्र आहे साक्षीला यांसह या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे या अजरामर गीताला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

उत्तरार्धात अगं नाच नाच राधे उधळूया रंग, सांग कधी कळणार तुला भाव माझ्या मनातला, तसेच लाजून हसणे... आणि मी फुलवंती, मी जलवंती या लावण्यांनी वातावरणात रंग भरला. पोवाड्याने छत्रपती शिवरायांच्या शौर्याची आठवण जागवली. अखेर लाभले भाग्य आम्हास बोलतो मराठी हे स्फूर्तिगीत घुमताच संपूर्ण सभागृह अभिमानाने उभे राहिले. हा क्षण कार्यक्रमाचा कळस ठरला. प्रमुख अतिथी डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया, डॉ. श्रीकृष्ण जोशी, ॲड. दीपक शर्मा व प्रमोद सोनटक्के यांनी समितीच्या कार्याचे कौतुक केले.

कलाकारांचा सन्मान तुकाराम गायकवाड, मनोज गायकवाड, नंदकुमार देशपांडे, शिवाजी बोलभट, सुनीता झिंजाड, चंद्रकांत कुलकर्णी व जिभाऊ शेवाळे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविकातून समितीचे माजी विद्यार्थी आणि कार्यकर्ते रवींद्र देशपांडे यांनी विद्यार्थी सहाय्यक समितीच्या कार्याची व पुणे, अहिल्यानगर येथील वसतिगृहाची ओळख करून दिली. आभार दिनकर वैद्य यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकर्ते पर्यवेक्षक अशोक कुलकर्णी, रोहिणी भनगडे, आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

वाळूचोरट्यांचा नवा फंडा; दिवसा दुचाकीने साठा, रात्री मिनी हायवातून वाहतूक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण– वाळूचोरीला आळा घालण्यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना केल्या जात असल्या तरी पैठण शहर व परिसरात वाळूचोरट्यांनी नवा फंडा सुरू केल्याचे दिसून येत आहे. दिवसा मोटारसायकलीवरून वाळू आणून ठिकठिकाणी साठा केला जातो आणि मध्यरात्रीच्या सुमारास मिनी हायवा ट्रकच्या माध्यमातून हा साठा अन्यत्र नेला जात असल्याची माहिती समोर आली आहे.

प्रतिष्ठान महाविद्यालय परिसर, धुंडीनाथ महाराज मठ परिसर तसेच लगतच्या भागात वाळूसाठे करून रात्रीच्या वेळी त्याची वाहतूक केली जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, या प्रकाराची माहिती प्रशासनाला देण्यात आली असूनही कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

गेल्या काही दिवसांपासून वाळूचोरीबाबत माध्यमांमधून वृत्त प्रसिद्ध होत असतानाही संबंधित यंत्रणेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. वाळूचोरट्यांवर कारवाई करण्यासाठी महसूल विभागाने रात्रीच्या वेळी विशेष पथकाद्वारे गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.

वाळूचोरीच्या या प्रकारामुळे शासनाचा महसूल बुडत असून, अवैध व्यवसायाला पाठबळ मिळत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

बालसदन गृहात जन्म दिवस साजरा करणे अभिमान वाटतो – प्रभावती ढाकणे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

खरवंडी कासार– अभिमान वाटतो सर्व सामान्यातील सागर राऊत कुटुंब गेल्या पाच वर्षांपासून आपल्या मुलाचा जन्मदिवस अनावश्यक खर्चाला फाटा देत शिवशंकर महीला सेवा भावी संस्था टेभुर्णी संचलीत निवासी मंतीमंद विद्यालय तथा शंकर महाराम बालसदन(बालगृह)जवळवाडी रोड खरवंडी कासार या ठिकाणी शालेय साहीत्यवाटप करत अन्नदान करत आहे. सागर राऊत यांचे चिरंजिव साई राऊत जन्म दिवसाच्या प्रसंगी मा . जिल्हा परिषद सदस्या प्रभावती प्रतापराव ढाकणे यांनी मनोगत व्यक्त केले यावेळी सालसिद्धेश्वर संस्थाण(मिडसांगवी)महंत हनुमंत महाराज शास्त्री माजी पंचायत समिती सदस्य किरण खेडकर आदि उपस्थित होते यावेळी महंत हनुमान शास्त्री यांनी विद्यालयाची पाहणी करत सर्व समिती संदर्भात माहीती अवतगत गेली प्रभावती ढाकणे यांचा सन्मान सागर राऊत सपत्तीक राऊत कुंटुबीयांच्या वतीने करण्यात आला तर महंत हनुमान महाराज शास्त्री यांचा सन्मान बाळासाहेब राऊत अंबादास राऊत तर किरण खेडकर यांचा सन्मान सागर राऊत पांडुरंग राऊत यांनी केला विद्यालयातील विद्यार्थांना मिष्ठांण भोजन देण्यात आले.

खरवंडी कासार येथे संतसेना महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

खरवंडी कासार– पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथे संत सेना महाराज पुण्यतिथी सोहळा उत्साहात संपन्न झाला श्रीक्षेत्र भगवान गडाचे महंत डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली वारकरी संप्रदायातील संत श्रेष्ठ श्री संत सेना महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी खरवंडी कासार येथे अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त पहाटेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती सकाळी ठीक ९:०० वाजता संत सेना महाराज यांच्या मूर्तीला शास्त्रोक्त पद्धतीने जलाभिषेक करण्यात आला.

यानंतर सकाळी संत सेना महाराज यांच्या प्रतिमेची वाजत-गाजत आणि भव्य दिव्य अशी मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीत परिसरातील अबालवृद्ध आणि भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते प्रवचन सेवा मिरवणुकीनंतर सकाळी ११ ते १ या वेळेत सालसिद्धेश्वर संस्थान (मिडसांगवी) चे महंत हभप हनुमंत महाराज शास्त्री यांची सुश्राव्य प्रवचन सेवा संपन्न झाली त्यांनी आपल्या प्रवचनातून संत सेना महाराज यांच्या जीवनकार्यावर आणि त्यांच्या विचारांवर प्रकाश टाकला खरवंडी कासार हा भगवानगडाचा आत्मा आहे.

खरवंडी मुळेच श्रीक्षेत्र भगवान गडाची निर्मिती झाली आपण भाग्यवान आहोत आणि याच भगवानगडाची खरवंडी येथिल जागा महंत डॉ. नामदेवशास्त्री यांनी श्रीसंत सेना महाराज मंदिर बांधकामासाठी बहाल केली काय सांगू संताचे उपकार संतांचे उपकार मानावे तेवढे कमी आहेत भगवानगडाच्या माध्यमातुन एकसे बढकर एक किर्तणकार गायक वादक तयार होत असुन तर शैक्षणिक क्षेत्रात विविध ठिकाणी मोठमोठ्या हुद्दावर गडाचे विद्यार्थी कार्यरत आहेत असे मत व्यक्त केले यावेळी भाविकांची मोठी उपस्थिती होती खरवंडी कासार येथील संत सेना महाराज यांचे मंदिर आता अद्यावत झाले असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही हा सोहळा नाभिक सेवा संघटनेच्या वतीने अत्यंत नेटकेपणाने आयोजित करण्यात आला होता. या पुण्यतिथी सोहळ्याचा आणि महाप्रसादाचा खरवंडी कासारसह परिसरातील हजारो भाविकांनी लाभ घेतला हा सोहळा यशस्वी करण्यासाठी नाभिक सेवा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले महाप्रसाद दत्तात्रय बापुराव राऊत यांच्या वतीन देण्यात आला महंत हनुमंत शास्त्री यांचा सन्मान दत्तात्रय राऊत बाळासाहेब राऊत अंबादास राऊत कृष्णा गायके आदी नाभिक संघटनेच्या वतीन करण्यात आला दिवसेन दिवस संत सेना महाराज पुण्यतीथी सोहळ्याचे रुप आकर्षक लक्षवेधी ठरत आहे .

गौरी शुगर अँड डिस्टिलरीजला SISSTA चा 'Best Factory Performance for Technical Efficiency' पुरस्कार

उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमतेबद्दल ओंकार शुगर समूहाचा चेन्नई येथे गौरव

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

बेलवंडी– चेन्नई, दि. ०५ सप्टेंबर २०२६ : गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता, प्रभावी कारखाना व्यवस्थापन आणि उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल Sugarcane & Sugar Technologists' Association (SISSTA) यांच्या वतीने गौरी शुगर अँड डिस्टिलरीज प्रा. लि., बाजोळगा, युनिट क्र. १३ यांना 'Best Factory Performance for Technical Efficiency Award' या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

SISSTA च्या ५५व्या Annual Convention & Sugar Expo 2026 मध्ये चेन्नई येथे आयोजित कार्यक्रमात हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ओंकार शुगरचे संचालक मा. ओमराजे बाबुराव बोत्रेपाटील यांनी ओंकार शुगर समूहाच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी ओंकार युनिट क्र. १३ मधील अधिकारी उपस्थित होते.

गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये गौरी शुगर अँड डिस्टिलरीजने मा. चेअरमन बाबुराव बोत्रेपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक विभागातील कार्यक्षमतेवर विशेष भर देत कारखान्याच्या विविध प्रक्रिया अधिक परिणामकारकपणे राबविल्या. उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य वापर, उत्पादन प्रक्रियेतील कार्यक्षमता, तांत्रिक व्यवस्थापन, सातत्यपूर्ण उत्पादनक्षमता आणि गुणवत्तेच्या बाबतीत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल सारख्या प्रतिष्ठित संस्थेने घेतल्याने या पुरस्काराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

ओंकार शुगर समूहाच्या वतीने गौरी शुगर अँड डिस्टिलरीजने प्राप्त केलेला हा पुरस्कार केवळ एका युनिटच्या कामगिरीचा गौरव नसून, संपूर्ण ओंकार समूहातील अधिकारी, कर्मचारी, कामगार आणि शेतकरी बांधव यांच्या सामूहिक प्रयत्नांना मिळालेली पावती आहे. साखर उद्योगामध्ये तांत्रिक प्रगती, कार्यक्षमता आणि गुणवत्तेला प्राधान्य देत ओंकार समूह सातत्याने आपली कामगिरी उंचावत आहे.

या यशाबद्दल ओंकार शुगरचे संचालक मा. ओमराजे बाबुराव बोत्रेपाटील, युनिट क्र. १३ चे अधिकारी, कर्मचारी व कामगार यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या कार्यक्षम आणि समर्पित योगदानामुळेच हा गौरव प्राप्त झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

या पुरस्काराबद्दल बोलताना कारखाना व्यवस्थापनाने सांगितले की, ''कार्यक्षमता, गुणवत्ता, तांत्रिक उत्कृष्टता आणि सातत्यपूर्ण प्रगती या बाबींना केंद्रस्थानी ठेवून ओंकार शुगर समूहाचा साखर उद्योगातील प्रवास सुरू आहे. कडून मिळालेला हा पुरस्कार आमच्या संपूर्ण टीमसाठी प्रेरणादायी असून, भविष्यात आणखी उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी नवी ऊर्जा देणारा आहे. साखर उद्योगात कार्यक्षमता, गुणवत्ता आणि सातत्यपूर्ण उत्कृष्टतेच्या माध्यमातून नवे मापदंड निर्माण करण्याचा ओंकार शुगरचा प्रयत्न यापुढेही सुरू राहील.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

महंत योगी गेंडानाथ महाराज पुण्यतिथी विविध धार्मिक कार्यक्रमाने संपन्न

अहिल्यानगर- महंत योगी गेंडानाथ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त काटवन खंडोबा रोडवरील त्यांच्या समाधीस्थळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी श्री विशाल गणेश मंदिर चे उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे ,श्री विशाल गणेश मंदिराचे महंत संगमनाथ महाराज, महंत निर्भयनाथजी महाराज (राशीन),महंत नवमीनाथजी महाराज (आळंदी) महंत भगवानाथजी महाराज (भिवडी) धर्मनाथजी महाराज (वैजापूर),मनोहर नाथजी महाराज (गुजराथ)आदित्यनाथजी महाराज ,सोहम नाथजी महाराज , मस्तनाथजी महाराज ,प्रसन्ननाथजी महाराज ,रवी नाथजी महाराज ,सिध्दीनाथजी महाराज ,लक्ष्मण नाथजी महाराज चंचलनाथजी महाराज ,भेरवनाथजी महाराज ,शुक्रनाथजी महाराज , ,आदि उपस्थित होते.याप्रसंगी महंत संगमनाथ महाराज म्हणाले, महंत योगी गेंडानाथ महाराज यांनी श्री विशाल गणेशाची अनेक वर्षे मनोभावे सेवा केली. अध्यात्माचा त्यांचा मोठा अभ्यास होता. नाथपंथी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार त्यांनी मोठ्या प्रमाणात केला. नगरमध्ये त्यांचा मोठा भक्तपरिवार आहे. त्यांच्या पुण्यतिथी दिनी धार्मिक कार्याप्रसंगी सर्वजण उपस्थित राहून, त्यांच्याप्रती कृतज्ञता भाव व्यक्त करतात. योगी गेंडानाथ महाराज यांच्या २८ व्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विविध राज्यातून आलेल्या महंत योगी यांच्या हस्ते सकाळी अभिषेक, आरती करण्यात आली. त्यानंतर सप्तपदी मंगल कार्यालय येथे आयोजित महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घेतला. तसेच यावेळी देवस्थान चे विस्वस्त पांडुरंग नन्नवरे ,रंगनाथ फुलसोंदर ,चंद्रकांत फुलारी ,विजय कोथिंबीरे ,ज्ञानेश्वर रासकर ,प्रा माणिकराव विधाते ,नितीन पुंड ,बाळासाहेब आगरकर ,नगरसेवक दत्ता गाडळकर,संभाजी कदम ,बाळासाहेब बोराटे,महेश लोंढे , राज्यभरातून आलेल्या योगी-महंत यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी पुणे (केडगांव) येथील भाविक - भक्तांही मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री विशाल भक्त सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

रॉयल ग्रुपचा दहीहंडी उत्सव दिमाखात

अहिल्यानगर - रॉयल ग्रुपच्या वतीने पाईपलाईन रोड, सावेडी येथे आयोजित करण्यात आलेला दहीहंडी उत्सव २०२६ मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. रॉयल ग्रुपच्या दहीहंडी उत्सवाचे यंदाचे १४ वे वर्ष असून, या सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. उत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या सिद्धिविनायक गोविंदा पथकाने पाच थरांची रचना करून दहीहंडी फोडली. गोविंदांनी मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडताच उपस्थित नागरिकांनी एकच जल्लोष केला. ढोल-ताशांचा गजर, गोविंदांचा उत्साह आणि नागरिकांचा टाळ्यांचा कडकडाट यामुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. दहीहंडी फोडण्याचा थरारक क्षण पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी तालयोगी वाद्यपथकाने दमदार सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. वाद्यपथकाच्या जोशपूर्ण सादरीकरणामुळे उत्सवाच्या वातावरणात आणखी रंगत आली. तालयोगीच्या तालावर उपस्थित नागरिकांनी उत्स्फूर्त दाद देत आनंद व्यक्त केला. पारंपरिक वाद्यांच्या गजराने संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले.

अवघ्या काही दिवसांत २२ कोटी ४२ लाखांच्या ठेवी जमा – बाबासाहेब बोडखे

अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीला शिक्षक आमदार किशोर दराडे यांची भेट । सोसायटीचे नुतन चेअरमन बाबासाहेब बोडखे यांचा सत्कार; कारभाराचे आमदार किशोर दराडेंकडून कौतुक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीला शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी भेट देऊन संस्थेच्या सुरू असलेल्या कार्याची पाहणी केली. संस्थेच्या कामकाजाचे कौतुक करत त्यांनी नूतन चेअरमन बाबासाहेब बोडखे यांचा सत्कार केला. यावेळी शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, शिक्षण उपसंचालक गणपत मोरे, संभाजी पाटील, माजी चेअरमन आप्पासाहेब शिंदे, सुनील पंडित, महेंद्र हिंगे, दिलीप काटे, वैभव सांगळे, अशोक आव्हाड, सुनील भोर, सचिन झगडे, अमोल ठाणगे, रवींद्र देवडे, राजेंद्र डमाळे, रवींद्र गावडे, तौसीफ शेख, सुधाकर सुंबे, आमदार किशोर दराडे यांचे स्वीय सहाय्यक हरीश मुंडे, संभाजी थोरात आदी उपस्थित होते.

यावेळी प्रास्ताविक करताना महेंद्र हिंगे यांनी माध्यमिक शिक्षक सोसायटीमध्ये परिवर्तन मंडळाची सत्ता आल्यानंतर सभासद हिताला केंद्रस्थानी ठेवून काटकसरीने कामकाज सुरू करण्यात आल्याचे सांगितले. संस्थेवरील सर्व वाढीव खर्चांना फाटा देऊन अनावश्यक खर्च कमी करण्याच्या दिशेने पावले उचलण्यात आली आहेत. तसेच संस्था स्वभांडवली करण्यासाठी वाटचाल सुरू असून, या उपक्रमाला सर्व सभासदांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याची माहिती त्यांनी दिली.

आमदार किशोर दराडे यांनी अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या सुरू असलेल्या कामकाजाचे कौतुक केले. चांगले निर्णय घेऊन संस्थेचा उत्तमपणे कारभार सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. संस्थेच्या कामकाजात आणखी सुधारणा करून जळगाव संस्थेच्या धर्तीवर विविध सोयी–सुविधा उभारण्याच्या सूचना त्यांनी मांडल्या. अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटी ही शिक्षकांची संस्था असून, ती राज्यासाठी एक आदर्शवत संस्था ठरू शकते, असेही आमदार दराडे यांनी सांगितले.

चेअरमन बाबासाहेब बोडखे यांनी संस्थेच्या आर्थिक वाटचालीची माहिती देताना सांगितले की, काही दिवसांपूर्वीच सोसायटीला स्वभांडवली करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. तसेच कर्जाचे व्याजदर कमी करण्याच्या उद्देशाने ऐच्छिक ठेव वाढ अभियान सुरू करण्यात आले. या अभियानाला सभासदांचा उत्तम प्रतिसाद मिळाला असून, काही दिवसांतच तब्बल २२ कोटी ४२ लाख रुपयांच्या ठेवी संस्थेत जमा झाल्या आहेत.

संस्थेची सत्ता परिवर्तन मंडळाकडे आल्यानंतर मागील मंडळाच्या कारकिर्दीत जिल्हा सहकारी बँकेकडून सुमारे १५८ कोटी रुपयांची कॅश क्रेडिटची उचल होती. त्यावर १२.५ टक्के व्याजदर होता. मात्र नियमबाह्य कामकाज थांबवून आणि काटकसर करून ही उचल ७२ कोटी रुपयांवर आणल्याचा दावा चेअरमन बाबासाहेब बोडखे यांनी केला.

संस्था स्वभांडवली करण्याच्या उद्देशाने विविध पावले उचलली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शैक्षणिक चळवळीतील पदाधिकारी संचालक म्हणून काम करत असताना सभासदांचे एकमेव हित डोळ्यासमोर ठेवून कारभार करत आहेत. कर्जाचे व्याजदर न वाढविता ऐच्छिक ठेव वाढ अभियानाच्या माध्यमातून व्याजदरदेखील कमी करण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे बोडखे यांनी स्पष्ट केले. जिल्हा सहकारी बँकेकडून १२.५ टक्के व्याजदराने घेतलेली कॅश क्रेडिटची उचल कमी झाल्यास कर्जाचे व्याजदरदेखील कमी करता येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी चेअरमन आप्पासाहेब शिंदे यांनी माध्यमिक शिक्षक सोसायटीला २५ वर्षांनंतर ऊर्जित अवस्थेत आणण्यासाठी परिवर्तन मंडळाचे सर्व संचालक योगदान देत असल्याचे सांगितले. सभासदांच्या पाल्यांसाठी विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. मुलींसाठी होस्टेल तयार करण्याच्या दृष्टीने महापालिका प्रशासनाकडे जागेसाठी पाठपुरावा सुरू आहे. तसेच सोसायटीच्या तिसऱ्या मजल्यावर स्पर्धा परीक्षेसाठी अभ्यासिकेचे काम सुरू असून, या अभ्यासिकेच्या माध्यमातून सभासदांच्या पाल्यांना स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन मिळणार असल्याची माहिती शिंदे यांनी दिली व उपस्थितांचे आभार मानले.

ताजनापूर लिफ्टच्या शिल्लक पाण्यातून शेवगाव तालुक्यातील २८ गावांना हक्काचे पाणी द्या

सर्वपक्षीय कृती समितीची कार्यकारी अभियंता व जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी; अन्यथा व्यापक जनआंदोलनाचा इशारा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

(छाया : बाबा पालवे)

अहिल्यानगर– जायकवाडी धरणाच्या निर्मितीसाठी शेवगाव तालुक्याने केलेल्या त्यागाची योग्य भरपाई म्हणून तालुक्याच्या हक्काचे पाणी पूर्व भागातील दुष्काळी गावांना मिळावे, या मागणीने पुन्हा जोर धरला आहे. ताजनापूर लिफ्ट टप्पा क्र. १ साठी राखीव असलेल्या शिल्लक पाण्यातून शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील २८ गावांमधील तलाव, बंधारे, नालाबंडिंग व पाणलोट क्षेत्र वर्षातून चार वेळा भरून देण्यात यावे. ही मागणी पूर्ण केल्याशिवाय ताजनापूर लिफ्टचे शिल्लक पाणी अन्य कोणत्याही तालुक्यासाठी देऊ नये, अशी ठाम भूमिका ताजनापूर लिफ्ट सर्वपक्षीय कृती समितीने घेतली आहे.

या मागणीचे निवेदन कृती समितीचे अध्यक्ष ॲड. शिवाजीराव काकडे व सौ. हर्षदा काकडे यांच्या नेतृत्वाखाली ताजनापूर मध्यम प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश पाटील तसेच जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना देण्यात आले.

शासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. अन्यथा शेवगाव तालुक्यातील शेतकरी व ग्रामस्थांना सोबत घेऊन व्यापक जनआंदोलन उभारण्याचा इशारा कृती समितीने दिला आहे.

जायकवाडीच्या निर्मितीसाठी २९ गावांचा त्याग..

निवेदनात म्हटले आहे की, जायकवाडी धरणाच्या निर्मितीपूर्वी शेवगाव तालुक्याच्या उत्तरेकडील गोदावरी नदीलगत २९ गावे व येथील सुपीक जमीन धरणाच्या निर्मितीसाठी शासनाने संपादित केली. या २९ गावांच्या विस्थापनाच्या पार्श्वभूमीवर शेवगाव तालुक्यातील शेतकरी व सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी ॲड. आबासाहेब काकडे यांच्या नेतृत्वाखाली १९६५ ते १९७८ या कालावधीत सातत्याने संघर्ष केला. या लढ्यात अनेक कार्यकर्ते व शेतकऱ्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. या संघर्षातून शेवगाव तालुक्यासाठी जायकवाडी धरणात ३.८ टीएमसी पाणी राखीव ठेवण्यात आले. पुढे ताजनापूर योजनेचे ताजनापूर टप्पा क्र. १ आणि टप्पा क्र. २ असे दोन भागात विभाजन करण्यात आले. टप्पा क्र. १ साठी १.६१ टीएमसी अर्थात ४३ द.ल.घ.मी. तर टप्पा क्र. २ साठी २.२६७ टीएमसी अर्थात ६४.२० द.ल.घ.मी. पाणी राखीव असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सन १९९९ पासून ॲड. शिवाजीराव काकडे यांच्या नेतृत्वाखाली शेवगाव तालुक्यातील दुष्काळी भागाला हे पाणी मिळावे यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. या संघर्षानंतर एप्रिल २००७ मध्ये २८ गावांच्या सर्वेक्षणाचे आदेश देण्यात आले होते. मात्र, जलसंपदा विभागाने ताजनापूर लिफ्ट टप्पा क्र. २ मध्ये केवळ १७ गावांचा समावेश केल्याने उर्वरित गावांचा पाण्याचा प्रश्न अद्याप कायमच आहे.

ताजनापूर लिफ्ट टप्पा क्र. १ साठी राखीव असलेल्या पाण्यातून प्रत्यक्ष वाटपानंतरही काही पाणी शिल्लक आहे. जलसंपदा विभागाने 'वाल्मी', छत्रपती संभाजीनगर या संस्थेमार्फत या योजनेचा तांत्रिक अभ्यास व अहवाल तयार केला असून या तांत्रिक अभ्यासानुसार उपलब्ध पाण्यातून प्रत्यक्ष पाणीवाटप केल्यानंतरही शिल्लक पाण्याचा उपयोग शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील दुष्काळी गावांसाठी करता येऊ शकतो, असा समितीचा दावा आहे. त्यामुळे हे पाणी अन्यत्र वळविण्याऐवजी शेवगावच्या २८ गावांमधील जलसाठे भरण्यासाठी वापरावे, अशी मागणीही कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

२८ गावांच्या जलसाठ्यांना पाणी देण्याची मागणी चेडेचांदगाव, बेलगाव, सुळे पिंपळगाव, अंतरवाली खु, अंतरवाली बु, शिंगोरी, राणेगाव, कोनोशी, शोभानगर, आधोडी, दिवटे, गोळेगाव, लमानतांडा, नागलवाडी, शेकटे खुर्द, लाडजळगाव, बाडगव्हाण, मुरमी, शेकटे बु, बालमटाकळी, गायकवाड जळगाव, सुकळी, बोधेगाव, सोनविहीर, ठाकूर पिंपळगाव, लखमापुरी, कांबी आणि हातगाव आदी २८ गावांतील तलाव, बंधारे, नालाबंडिंग तसेच पाणलोट क्षेत्र भरून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

या भागातील बहुतांश जमीन खडकाळ व डोंगराळ आहे. पावसाचे प्रमाणही कमी असल्याने शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. या परिसरातील शेतकरी, ऊसतोडणी कामगार, भूमिहीन व अल्पभूधारक कुटुंबांना पाण्याच्या उपलब्धतेअभावी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. हक्काचे पाणी उपलब्ध झाल्यास शेती उत्पादन वाढण्याबरोबरच स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळून नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल, असे निवेदनात म्हटले आहे.

आविष्कार स्पर्धेच्या कार्यशाळेचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– के. जी.महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, सर्जनशीलता व नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी आविष्कार स्पर्धेच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आविष्कार कार्यशाळा या कार्यक्रमास महाविद्यालयाचे विश्वस्त संचालक माननीय श्री किशोरजी मुनोत तसेच परिसर संचालिका माननीय डॉ. स्वाती मुनोत यांनी कार्यशाळेत आविष्कार स्पर्धेचे स्वरूप, संशोधन प्रकल्पाची निवड, संशोधन पद्धती, प्रकल्प मांडणी, नावीन्यपूर्ण संकल्पना तसेच प्रकल्पाचे सादरीकरण याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तसेच प्रा. स्नेहल बोरोवके यांनी संशोधनाचे महत्व आणि आविष्कार स्पर्धेतील सहभागाचे फायदे समजावून सांगितले. आविष्कार समन्वयक डॉ. वर्षा कीर्तने यांनी प्रस्ताविकात संशोधन कार्यशाळेच्या आयोजना मागील उद्देश स्पष्ट केला.तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांचे निरसन करून त्यांना आवश्यक सूचना दिल्या. प्रा. योगेश चकोते यांनी आभारप्रदर्शन केले. यावेळी प्रा. रोहिणी क्षीरसागर तसेच सौ. हर्षाली रासकर आणि विध्यार्थी उपस्थित होते.

प्रयास दादी-नानी ग्रुपच्या महिलांचा कृष्णजन्माष्टमी सोहळा उत्साहात; भजनांनी रंगले भक्तिमय वातावरण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– प्रयास दादी–नानी ग्रुपच्या वतीने श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने महिला एकत्र आल्या होत्या. महिलांनी सामूहिकरित्या श्रीकृष्णाची भजने, गीते आणि भक्तिगीते सादर केल्याने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. पारंपरिक पद्धतीने श्रीकृष्ण जन्माचा देखावा साकारण्यात आला होता.

कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका संध्या पवार, नगरसेविका गीतांजली काळे, प्रिया गुंदेचा–मुनोत, प्रयास ग्रुपच्या उपाध्यक्ष राजश्री शितोळे, सचिव तेजल शितोळे, दादी–नानी ग्रुपचे अध्यक्षा जयाताई गायकवाड, प्रयास ग्रुप अध्यक्ष रजनी भंडारी, ज्योती जोशी, स्वाती गुंदेचा, संस्थापिका अलकाताई मुंदडा, उपाध्यक्ष सुचेता बोरकर, खजिनदार मेघना मुनोत, वैशाली क्षीरसागर, सरस्वती झंवर, संपुर्णा देशमुख, सारिका रघुवंशी, नीता घावटे, ॲड. स्वाती जाधव, गीता कवाने, वर्षा गांधी, डॉ. योगीता चंगेडिया, सोहनी पुरनाळे, सुजाता कदम, अरुणा गोयल, उषा सोनी, सुशीला त्र्यंबके, लीला अग्रवाल, सुरेखा जंगम, उषा सोनटक्के, अलका वाघ, सुनीता काळे, संगीता दंडवाणी, रेखा फिरोदिया, जयश्री पुरोहित, आशा गायकवाड, उज्वला बोगावत, प्रतिभा रासकर, दीपा मालू, दीपा सोनी आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमात श्रीकृष्ण जन्माचा सुंदर आणि आकर्षक देखावा सादर करण्यात आला. फुलांनी व आकर्षक सजावटीने श्रीकृष्णाचा पाळणा सजविण्यात आला होता. जन्माष्टमीच्या पारंपरिक उत्साहात महिलांनी श्रीकृष्णाच्या पाळण्याला झोका देत भक्तिभाव व्यक्त केला. 'गोविंदा', 'गोपाल', 'नंदलाला'च्या जयघोषाने वातावरण अधिकच मंगलमय झाले. काही चिमुकल्यांनी श्रीकृष्ण आणि राधेच्या पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

महिलांनी सादर केलेल्या श्रीकृष्णाच्या भजनांमुळे कार्यक्रमात आध्यात्मिक आणि प्रसन्न वातावरण निर्माण झाले. भक्तिगीतांसोबतच महिलांनी विविध सांस्कृतिक उपक्रमांत उत्स्फूर्त सहभाग घेतला. जन्माष्टमी सोहळ्याच्या निमित्ताने महिलांसाठी सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. यासोबतच विविध मनोरंजनात्मक तसेच बौद्धिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्पर्धांचा आनंद लुटला. स्पर्धांच्या माध्यमातून महिलांच्या ज्ञानाला चालना देण्याबरोबरच त्यांच्या कलागुणांना आणि बुद्धिमत्तेला व्यासपीठ मिळाले. हसत–खेळत पार पडलेल्या या स्पर्धांमुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. स्पर्धे तील विजेत्या महिलांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

नगरसेविका संध्या पवार यांनी महिलांना शुभेच्छा देताना, भारतीय संस्कृती आणि परंपरांचे जतन करण्यामध्ये महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. प्रिया गुंदेचा–मुनोत यांनी जन्माष्टमीच्या शुभेच्छा देत अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे महिलांमध्ये आनंद, उत्साह आणि एकोप्याची भावना निर्माण होत असल्याचे सांगितले. राजश्री शितोळे यांनी प्रयास दादी–नानी ग्रुपच्या माध्यमातून महिलांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून, महिलांनी अशा कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

श्रीराम कृष्ण एज्युकेशन फाउंडेशन मध्ये विविध स्पर्धां द्वारे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– आजच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शैक्षणिक बुद्धिमत्तेबरोबरच आपले विचार उत्कृष्ट पद्धतीने दुसऱ्या समोर मांडणे ही एक कला आहे हे लक्षात घेऊन श्रीराम कृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना कनिष्ठ महाविद्यालयात आंतरशालेय इंग्लिश वक्तृत्व स्पर्धा, संस्कृत स्तोत्र पाठांतर स्पर्धा व उत्पादन विकसितता या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या माननीय डॉ. कुंदा हळबे होत्या तर अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. श्रीगोपाल धूत होते.

इंग्लिश वक्तृत्व व स्तोत्र पाठांतर स्पर्धेमुळे वाचन लेखन कौशल्य वाढते व उच्चारण स्पष्ट होण्यास मदत होते असे मनोगत कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या माननीय डॉ.कुंदा हळबे यांनी व्यक्त केले. शहरातील सर्व शाळांनी या विविध स्पर्धांना उत्तम प्रतिसाद

दिला. एकूण २४ शाळांतील १२५ विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला. प्रत्येक स्पर्धेसाठी दोन गट करण्यात आले होते त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते.त्याबद्दल कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय श्री. श्रीगोपाल धूत यांनी समाधान व्यक्त केले व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या सर्व स्पर्धांचे परीक्षण सुवर्णा मिसाळ, दिव्या दौलतानी, भावना वैकर, रंगनाथ देशमुख, श्रीगोपाल जाखोटिया, सुनंदा रच्चा यांनी केले. परीक्षकांनीही विद्यालयाने अशा प्रकारच्या स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांना आपले गुण दाखवण्याची संधी दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

इंग्लिश वक्तृत्व स्पर्धेमध्ये रोख पारितोषिक रुपये २०००,१५००,१०००, व ५०० रुपये तसेच प्रशस्तीपत्रक व सन्मान चिन्ह देऊन विजेत्यांचा गौरव करण्यात आला. तर . संस्कृत स्तोत्र पाठांतर स्पर्धेमध्ये रुपये १००१,७५१,५०० व उत्तेजनार्थ २५० व विशेष पारितोषिक ५०० रुपये, सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.

उत्पादन विकसितता स्पर्धेत विजेत्यांना रुपये २०००,१०००,७५० व ५०० रुपये सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट हायस्कूल, समर्थ विद्यामंदिर सावेडी, आयकॉन पब्लिक स्कूल, आठरे पाटील पब्लिक स्कूल, स्नेहालय स्कूल, सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पारितोषिके पटकावली.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष माननीय मोहनलाल मानधना, सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव माननीय बजरंग दरक, विश्वस्त रामसुख मंत्री, रवींद्र गुजराथी, अरुण झंवर, तसेच विद्यालयाच्या प्राचार्या गगनप्रीत वाधवा यांनी सर्व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

एनएच-५४८डी वरील अतिक्रमणे हटवा; महामार्गाची अंतिम हद्द निश्चित करा

शासनाच्या परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी करण्याची अवधूत पवार यांची मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

जामखेड– जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. -५४८ वरील अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे हटवून महामार्गाची अधिकृत Right of Way (ROW) आणि मध्यरेषा निश्चित करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी केली आहे. याबाबत त्यांनी अहिल्यानगर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले असून, त्याची प्रत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी तसेच राष्ट्रीय महामार्ग विभाग, नाशिक यांच्या कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आली आहे.

राष्ट्रीय महामार्गांच्या सुरक्षिततेबाबत सर्वोच्च न्यायालयाने १३ एप्रिल २०२६ रोजी - Suo-Moto Writ Petition (Civil) No. 9/2025 – Phalodi Accident versus National Highways Authority of India with W.P.(C) No. 9900/2025 या प्रकरणात निर्देश दिले आहेत. त्यानुसार महामार्गाच्या मध्ये नवीन ढाबे, खानावळी व व्यावसायिक बांधकामांना प्रतिबंध तसेच अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या

निर्देशांची -५४८ वर प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी पवार यांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने १० ऑगस्ट २०२६ रोजी शासन परिपत्रक जारी केले आहे. त्यामध्ये राष्ट्रीय महामार्गाच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यासह जमीन वापर बदल आणि मधील अतिक्रमणांबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या परिपत्रकाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

महामार्गाची मध्यरेषा व निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभाग, भूमी अभिलेख, महसूल विभाग आणि जामखेड नगरपरिषद यांच्या संयुक्त उपस्थितीत मोजणी करावी. समर्थ हॉस्पिटल ते बीड कॉर्नर, बीड कॉर्नर ते खर्डा चौक तसेच नगरपरिषद हद्दीतील सर्व बाधित भागांची पाहणी करून अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामांची यादी तयार करावी. संबंधित परवाने व चेही पुनरावलोकन करावे, अशी मागणी आहे. तसेच District Highway Safety Task Force मार्फत संपूर्ण महामार्गाची पाहणी करून अपघातप्रवण ठिकाणे, वाहतूक अडथळे आणि सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांचा अहवाल तयार करावा. महामार्गाची अंतिम हद्द निश्चित करताना सध्याच्या रस्त्याची रुंदी न पाहता मंजूर भविष्यातील रुंदीकरण आणि मानकांचा विचार करावा, असे पवार यांनी म्हटले आहे. नागरिकांची सुरक्षितता आणि जामखेडच्या भविष्यातील विकासाचा विचार करून प्रशासनाने या प्रकरणात कालबद्ध कारवाई करावी. महामार्गाची अंतिम हद्द व अतिक्रमणांची यादी सार्वजनिक करून केलेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल द्यावा, अशी मागणी अवधूत पवार यांनी केली आहे.

घराणेशाहीला थारा नको सर्वसामान्य कार्यकर्त्याला न्याय द्या; जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करा

ॲड. सुरेश लगड यांची मुख्यमंत्र्याकडे मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक प्रक्रिया सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात अध्यक्ष पदावरून चर्चेला उधाण आले आहे. जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी म्हणून यासाठी अनेक राजकीय नेत्यांकडून प्रयत्न सुरू असले तरी बिनविरोधाच्या नावाखाली पुन्हा घराणेशाहीला आणि मोजक्या राजकीय घराण्यांच्या वर्चस्वाला खत पाणी घालू नये .अशी स्पष्ट भूमिका जिल्ह्याचे जेष्ठविधीज्ञ ॲड सुरेश लगड यांनी मांडली आहे .जिल्ह्यातील विविध सत्ता स्थानी अनेक वर्षापासून काही ठराविक राजकीय घराण्याचे वर्चस्व राहिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था, विविध पदे आणि राजकीय सत्ता स्थानी यामध्ये त्याच घरातील व्यक्तींना सातत्याने संधी मिळत असल्याची भावना सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये आहे. त्यामुळे जिल्हा बँकेचे अध्यक्षपदी पुन्हा त्याच घराण्यामध्ये फिरू नये अशी मागणी ॲड लगड यांनी केली आहे.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यास आपला विरोध नसल्याचे स्पष्ट करताना ॲड लगड यांनी बिनविरोध निवडणूक ही सहकाराच्या हितासाठी असावी. परंतु ती एखाद्या व्यक्तीला किंवा राजकीय घराण्याला अध्यक्षपद देण्यासाठीची तडजोड ठरू नये. बँकेचे अध्यक्ष पदासाठी कोणाचे नाव पुढे येणार याची चर्चा सुरू झाली असतानाच घराणेशाहीचा मुद्दा ऐरणीवर आणला आहे.एखाद्या उमेदवाराच्या नावाला विरोध असेल तर त्या व्यक्तींनी मुळातच निवडणुक लढू नये आणि यदाकदाचित निवडणूक लढणार असेल तर अध्यक्ष पदाची मागणी करू नये .अशी भूमिका ॲड सुरेश लगड यांनी मांडली.वास्तविक पाहता बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सर्व घटकांनी सामंजस्याची भूमिका घ्यावी .मात्र त्या सामंजस्याचा फायदा घेऊन आधीच सत्तेची अनेक पदे भूषवणाऱ्या राजकीय घराण्यांनाच पुन्हा महत्वाचे पद देणे योग्य ठरणार नाही असे ॲड लगड यांनी स्पष्ट केले कार्यकर्त्यांची संधी कायम कुठे?

वर्षानुवर्षे पक्षासाठी आणि सहकार क्षेत्रासाठी काम करणाऱ्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी कधी मिळणार? हा खरा प्रश्न आहे ज्यांच्या घरातील एक व्यक्ती पदावर ,दुसरी सत्ता केंद्रात आणि तिसरी राजकारणात सक्रिय अशा पद्धतीने सत्तेची पदे घरातच फिरत राहिली तर सामान्य कार्यकर्ता शेवटी केवळ झेंडे आणि खुर्च्या लावण्यासाठी उरणार का? असा सवाल ॲड सुरेश लगड यांनी उपस्थित केला आहे राजकारणात नव्या नेतृत्वाला संधी मिळणे आवश्यक आहे एखाद्या सामान्य कार्यकर्त्याने अनेक वर्ष पक्षाचे, सहकाराचे आणि समाजाचे काम केले असेल तर त्यालाही नेतृत्वाची संधी मिळाली पाहिजे घराण्याच्या नावावर नव्हे तर कार्यकर्त्याच्या कामाच्या बळावर पद मिळाले पाहिजे अशी अपेक्षाही ॲड लगड यांनी व्यक्त केली आहे.

तेव्हा जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री पुढाकार घेत असतील तर त्यांनी घराणेशाहीला प्रोत्साहन न देता सर्वसामान्य कार्यकर्ते पदाधिकारी आणि सहकार क्षेत्रात प्रत्यक्ष काम करणारी व्यक्तींना न्याय मिळेल अशी भूमिका घ्यावी अशी मागणी ॲड लगड यांनी शेवटी केली आहे .जिल्हा बँक ही केवळ राजकीय सत्ता मिळण्याचे केंद्र नसून शेतकरी ,सहकारी संस्था आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी जोडलेली महत्त्वाची संस्था आहे .त्यामुळे तिचे नेतृत्वही व्यापक सहकार क्षेत्राचा विचार करणारे आणि सर्व घटकांना सोबत घेणारे असावे असे ही ॲड सुरेश लगड यांनी मुख्यमंत्री महोदय यांना केलेल्या मागणीत म्हटले आहे . घराणेशाही असलेल्या राजकीय कुटुंबातील मुलांनी केवळ घराण्याच्या बळावर पुन्हा सत्ता केंद्र बनण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरू नये सर्वसामान्य कार्यकर्त्यांना आणि पदे पदाधिकाऱ्यांना न्याय दिला तरच नव्या नेतृत्वाला संधी मिळेल आणि जिल्ह्याच्या राजकारणात परिवर्तन घडेल असा स्पष्ट संदेश ॲड सुरेश लगड यांनी दिला आहे. सबब जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी पण घराणेशाहीच्या किंमतीवर नको अशी मागणी ॲड लगड यांनी मुख्य मंत्री महोदय यांचेकडे केली आहे.

एकच गुन्हा असताना मोक्का कारवाईचा आरोप; बेलवंडी पोलिसांच्या भूमिकेची चौकशीची मागणी

खोटा गुन्हा दाखल करून बेकायदेशीर मोक्का लावुन चार महिने अटक केली राजेंद्र उबाळे यांचा आरोप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– बेलवंडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील राजापूर (ता. श्रीगोंदा) येथे दाखल करण्यात आलेला गुन्हा खोट्या पद्धतीने दाखल करण्यात आला असून, एकच गुन्हा असतानाही त्यामध्ये बेकायदेशीररीत्या मोक्का (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) कारवाई करण्यात आल्याचा गंभीर आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)चे पारनेर तालुकाध्यक्ष राजेंद्र उबाळे यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरून निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, तसेच त्यांच्या संपत्तीची चौकशी करावी, या मागणीसाठी उबाळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

राजेंद्र उबाळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राजापूर येथे संबंधित गुन्हा घडला त्यावेळी आपण पुणे येथे होतो. घटनास्थळी उपस्थित नसल्याचे सिद्ध करणारे सीसीटीव्ही फुटेज तसेच इतर पुरावे पोलिसांना देण्यासाठी गेलो असता ते स्वीकारण्यात आले नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. संबंधित प्रकरणात न्यायालयातून अटकपूर्व जामीन मिळाल्यानंतरही तत्कालीन बेलवंडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संपत शिंदे यांनी मोक्का लावण्याची धमकी दिल्याचा दावा उबाळे यांनी केला आहे. मोक्काच्या नावाखाली आर्थिक लूट केल्याचा आरोप गुन्हा क्रमांक ०२२७/२०२१ संदर्भात तत्कालीन पोलीस निरीक्षक संपत शिंदे यांनी खोटा गुन्हा दाखल करून बेकायदेशीर मोक्का प्रस्ताव दाखल केल्याचा आरोप उबाळे यांनी केला आहे.

मराठा पतसंस्था ही सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन करणारी चळवळ – मा.आ.अमोलभाऊ खताळ पा.

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

संगमनेर– मराठा पतसंस्था ही सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन करणारी चळवळ आहे. या पतसंस्थेने असाच उदात्त हेतू ठेवून काम केले तर बहुजन समाजाला विकासाच्या प्रवाहात येण्यासाठी फार काळ जाईल असे वाटत नाही.कारण संस्था सर्व प्रकारच्या क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांच्या कामाची दखल घेऊन त्यांचाही सन्मान करते.असे मा.आमदार अमोल भाऊ खताळ पा.म्हणाले. मराठा पतसंस्था अहिल्यानगर शाखा संगमनेर या शाखेच्या स्थलांतरित कार्यालयाचा समारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

सभेच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक संस्थेचे संस्थापक चेअरमन डॉ.इंजि विजय कुमार ठुबे होते. आमदार अमोल खताळ पा पुढे म्हणाले की,आज पतसंस्था चालविणे अतिशय जोखमीचे व कठीण काम झाले आहे.कर्जदार थकला की तो संस्थेच्या विरोधात बोलायला सूरुवात करतो. तरीही मराठा पतसंस्था सक्षमपणे काम करत आहे. या संस्थेच्या आठ शाखा असुन संगमनेर शाखेचा व्यवसाय सर्वोत्तम आहे.कारण या संस्थेचे शाखाध्यक्ष तथा संचालक काशिनाथ डोंगरे हे सहकारातील कुशल नेतृत्व आहे तसेच उत्तम प्रशासक

आहेत. काशिनाथ डोंगरे सारखे पदाधिकारी जोपर्यंत सहकारात काम करतील तोपर्यंत सहकारी संस्था सामान्य माणसाला सुखी करण्यासाठी काम करतील.व समाज्याचा विश्वास सार्थ करतील.याबद्दल मला अभिमान आहे.

संस्थेचे व्यवस्थापन अतिशय चांगले व पारदर्शक आहे.म्हणुन ही संस्था सामाजिक उपक्रम हाती घेते. समाज्याला दिशा देण्याचे काम करत आहे. प्रस्ताविक करताना चेअरमन डॉ इंजि विजय कुमार ठुबे म्हणाले की,आम्ही मराठा सेवा संघाचे पाईक आहोत त्यामुळे सार्वजनिक जीवनात पवित्र काम करण्याची शपथ आम्ही घेतलेली आहे.

मराठा पतसंस्था नेहमी विकासात सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून काम करत आहे.बहुजन समाज्याने अंधश्रद्धा पासुन दुर जाऊन श्रध्देवर विश्वास ठेवला तर दारिद्र्य निर्मूलन होईल. आमदार अमोल खताळ पा यांचे हस्ते स्थलांतरित कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.नंतर सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी शिक्षण दिनानिमित्त मा आमदार अमोल भाऊ खताळ पा यांचे शुभहस्ते शिवश्री प्रा जयसिंग सहाणे शिवश्री मा.प्राचार्य एम एम फटांगरे शिवश्री बी आर नागरे सर मा.केंद्रप्रमुख तसेच शिवश्री मा.प्राचार्य आर बी वाळे यांचे सत्कार करण्यात आले.

तसेच शासनाच्या विविध क्षेत्रात सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांचा तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.तसेच संस्थेच्या यशामध्ये सहभागी असलेल्या सभासदांचा सत्कार आमदार महोदय यांचे हस्ते करण्यात आला. या प्रसंगी युवा वार्ता वर्तमानपत्राचे संपादक शिवश्री किसन हासे सर म्हणाले, दुरदृष्टी ठेवून काम केले तर सहकारी संस्था सक्षम पणे काम करतात.याचे उत्तम उदाहरण मराठा पतसंस्था आहे.जो पर्यंत काशिनाथ डोंगरे यांचे सारखे संचालक संस्थांमध्ये काम करतील तो पर्यंत कोणत्याही संकटाला संस्था सामोरे जाईल.संगमनेर शाखेचे काम भुषणावह आहे.आणि यापुढेही राहील. तसेच शिवश्री शिवाजीराव फटांगरे म्हणाले की संचालक काशिनाथ डोंगरे यांचे काम दिशादर्शक आहे.

महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात राष्ट्रीय उद्योजकता दिन साजरा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

बेलवंडी– रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्यावतीने राष्ट्रीय उद्योजकता दिन साजरा करण्यात आला. राष्ट्रीय उद्योजकता दिनानिमित्त पोस्टर प्रदर्शन व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संदीप अभंग उपस्थित होते. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची आवड निर्माण व्हावी, नवकल्पनांना प्रोत्साहन मिळावे आणि विद्यार्थ्यांनी रोजगार शोधणारे न राहता रोजगार निर्माण करणारे बनावे. असे विचार त्यांनी मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.प्रकाश साळवे होते. यावेळी त्यांनी उद्योजकतेचे महत्त्व, व्यवसायातील संधी, नवकल्पना, जोखीम स्वीकारण्याची क्षमता आणि आत्मनिर्भरतेचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन

केले.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी पोस्टर प्रदर्शनातून नवकल्पना सादरीकरण व प्रश्नोत्तराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध व्यवसाय कल्पना मांडल्या. पाहुण्यांचे स्वागत व मनोगत अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुदाम भुजबळ यांनी केले. प्रास्ताविक प्रा. वैशाली घोडके यांनी केले. या समारंभ प्रसंगी प्रो. डॉ. राजेंद्र ठाकरे, प्रो.डॉ. राजाराम कानडे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन दिव्या मांडे व चैताली चाकणे यांनी केले.आभार प्रा. सिद्धार्थ बर्वे यांनी मानले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीला नवे नेतृत्व; पैठण तालुका महिला अध्यक्षपदी ॲड. अंजली बांगर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण– राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पैठण तालुका महिला आघाडीच्या अध्यक्षपदी ॲड. अंजली बांगर यांची नियुक्ती करण्यात आली. आमदार तथा जिल्हाध्यक्ष सतीशभाऊ चव्हाण यांच्या मान्यतेने जिल्हाध्यक्ष स्वाती कोलते यांनी त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

पक्ष संघटन मजबूत करण्यासह महिला कार्यकर्त्यांना एकत्रित करून आगामी काळात पक्षाची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी ॲड. बांगर

यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वागत केले.

यावेळी प्रदेश सरचिटणीस दिलीप बनकर, तालुकाध्यक्ष विलास शेलके, विधानसभा अध्यक्ष विनोद भाऊ तांबे, सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष अनिल हजारे, युवानेते किशोर तावरे, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर पा. कापसे, एकनाथ जाधव, ऋषिकेश चौधरी आदी उपस्थित होते.ॲड. अंजली बांगर यांच्या नियुक्तीमुळे पैठण तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला संघटनेला बळ मिळणार असून, आगामी काळात संघटन विस्ताराला वेग येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

जावक क्रमांक ३८६/२०२६

जाहीर नोटीस

श्रीगोंदा येथील कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, श्रीगोंदा यांचे न्यायायलय

जन्म नोंद अर्ज क्र. ३८६/२०२६ नेमलेली तारीख

रेखा विजय नितनवरे,
रा. येळपणे, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर
विरूध्द
ग्राम पंचायत येळपणे,
नगरपरिषद श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर

या द्वारे नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार **श्री/श्रीम. रेखा विजय नितनवरे यांचे सासरे कै. हरी ठाणू नितनवरे मृत्यू मौजे येळपणे ता. श्रीगोंदा** येथे झाला आहे. सदर व्यक्तीची मृत्यू नोंद नगरपरिषद/ ग्राम पंचायत येळपणे, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर येथे आढळून येत नाही. म्हणून सदर व्यक्तीने मृत्यू नोंद होण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे.

जर कोणाला सदरचे अर्जातील नमुद व्यक्तीचे मृत्यू नोंद होण्याबाबत हरकत घ्यावयाची असेल त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत अथवा नेमलेल्या तारखेच्या दिवशी सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर वकीलासह हजर राहून होऊन आपली हरकत दाखल करावी अन्यथा मुदतीत हरकत दाखल नाही असे समजून सदरचे अर्जाबाबत योग्य ते आदेश केले जातील. याची नोंद घ्यावी. आज दि. २१/०७२०२६ रोजी माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

सही/-
तालुका कार्यकारी अधिकारी
तथा तहसीदार, श्रीगोंदा

११ सप्टेंबर २०२६ रोजी अहिल्यानगर येथे मुख्याध्यापकांचे चर्चासत्र

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– शुक्रवार दिनांक ११ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ व अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अमरज्योत मंगल कार्यालय, नगर-कल्याण रोड बायपास जवळ, अहिल्यानगर येथे मुख्याध्यापक संघाचे एक दिवसीय शैक्षणिक चर्चासत्र आयोजित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा संघाचे अध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित यांनी दिली.

शिक्षण क्षेत्रातील विविध उपक्रम, शैक्षणिक गुणवत्ता, नवोपक्रमशील शिक्षकांचे कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम, तसेच शिक्षण क्षेत्रातील बदलत्या प्रवाहावर विचारमंथन करण्याच्या उद्देशाने 'ज्ञान कलश' विशेषांकाचे या चर्चासत्रामध्ये प्रकाशन करण्यात येणार असून, या चर्चासत्रासाठी आमदार संग्राम भैया जगताप, आमदार डॉक्टर सत्यजित तांबे, उपमहापौर धनंजय जाधव, महाराष्ट्र राज्याचे आयुक्त शिक्षण श्री. सिचन्द्र प्रताप सिंह, शिक्षण संचालक मा. डॉक्टर महेश जी पालकर, राज्याचे सहसंचालक मा. रमाकांत काटमोरे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय अध्यक्ष मा. औदुंबर उकिर्डे, शिक्षण उपसंचालक डॉक्टर गणपतराव मोरे, माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी बी. जे. पाटील, योजना विभागाचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, माजी शिक्षणाधिकारी दिलीपराव थोरे, पांडुरंग मगर आदी अधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

तसेच जिल्ह्यातील गुणवंत मुख्याध्यापकांना पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व शाळांच्या मुख्याध्यापक, प्राचार्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, सरचिटणीस मिथुन डोंगरे, जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र वाघ, आबासाहेब गर्दे, बाळासाहेब जंगले, बाळासाहेब वाघ, प्रकाश देशमुख, बालाजी गायकवाड, संघटन मंत्री संजय लहारे, कार्यालय मंत्री मंगेश जाधव, राज्य एज्युकेशन जनरलचे सहसंपादक सुनील भोर, खजिनदार एम. बी. राऊत, नगर तालुका अध्यक्ष यशवंत भुतकर, सचिव संभाजी पवार, दत्तात्रय काळे, विद्या सचिव सुनील धुमाळ, श्रीकृष्ण पवार, महानगर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष ज्ञानदेव बेरड, सचिव शिवाजीराव घाडगे, सौ. शितल बांगर, संगीता तांबे, सुनील सुसरे आदींनी केले आहे.

(पान १ वरून)

डीएसपी चौकातील वाहतूक कोंडीला आता कायमस्वरूपी तोडगा

दररोज सामना करावा लागत होता.

त्यामुळे उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर अहिल्यानगरकरांच्या रोजच्या प्रवासातील वेळ आणि त्रास कमी होणे हा या प्रकल्पाचा सर्वात मोठा परिणाम ठरणार आहे. अहिल्यानगर शहराचा विस्तार वेगाने होत असून, वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि शहराला जोडणाऱ्या प्रमुख मार्गांवरील वाहतूक लक्षात घेता भविष्यातील गरजांसाठी पायाभूत सुविधा सक्षम करणे आवश्यक झाले आहे. त्या दृष्टीने डीएसपी चौकातील उड्डाणपूल हा केवळ सध्याची वाहतूक कोंडी कमी करणारा प्रकल्प नसून, अहिल्यानगर शहराच्या पुढील अनेक वर्षांच्या वाहतूक व्यवस्थेचा विचार करून उचललेले महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. वर्षानुवर्षे डीएसपी चौकातील कोंडीचा त्रास सहन करणाऱ्या नागरिकांसाठी उड्डाणपुलाच्या मंजुरीमुळे आता मोठा दिलासा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनातून, आमदार संग्राम जगताप यांच्या सहकार्याने आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या महत्त्वपूर्ण प्रकल्पाला गती मिळाली आहे. अहिल्यानगर शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या या प्रकल्पासाठी निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच महायुती सरकारचे मनःपूर्वक आभार, अशी भावना डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केली. शहराच्या वाढत्या गरजा आणि भविष्यातील वाहतुकीचा विचार करून शासनाने घेतलेला हा निर्णय अहिल्यानगरच्या विकासाला अधिक गती देणारा ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

शेवगावात दोन किलो गांजासह एकाला अटक, दोघे फरार

निरीक्षक मोहन बोरसे, स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस अंमलदारांनी संयुक्तपणे सयाजी कोल्हे

याच्या घरावर छापा टाकला. घराच्या झडतीदरम्यान ६९ हजार रुपये किमतीचा २ किलो १३० ग्रॅम गांजा, सोळाशे रुपयांच्या ८० चिलमी व एक हजार रुपयांचा वजन काटा मिळून आला. पोलिसांनी संकेत कोल्हे यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता, तो व त्याचे वडील मिळून हा गांजा जिरेवाडी (ता. पाथर्डी) येथील मोन्या कैलास पवार याच्याकडून विकत आणून विकत असल्याची कबुली दिली. या प्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.